| MHPA140002102023 | निशाणी क्र. ८० वरील आदेश<br>दिनांक २४.०२.२०२५ |
|---|---|

१. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिदाव्यातील वादी यांनी खालील मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रतिदाव्यातील वादी यांच्या शांततामय ताब्यामध्ये अडीअडथळा करू नये असा तात्पूरता मनाई हुकूम मागितला आहे.

वादमिळकतीचा तपशिल

मौजे कात्नेश्वर, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी येथील शेत गट क्र.४०७ एकुण क्षेत्रफळ ०८ हेक्टर ८३ आर पैकी ०७ एक्कर १४ आर यातील दोन एक्कर जमीन जिच्या चतु:सिमा पुढील प्रमाणे.

पूर्वेस – शिवाजी डावरे,

पश्चिमेस – सुमनबाई अंबादास डावरे,

दक्षिणेस – जयाबाई डावरे,

उत्तरेस - केशवराव चापके जमादार.

नामे विहीरीची व रामफळाची पटटी.

सदर मालमत्तेस यापुढे आदेशामध्ये वारंवारीता टाळण्याकरीता ''वाद मिळकत'' असे संबोधण्यात येईल.

०२. प्रतिदाव्यातील वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र.१ ही वादी यांचे भाऊ केशवराव यांची सुन आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ हया सख्ख्या बहीणी असुन त्या केशवराव यांच्या मुली आहेत. प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचा वादीच्या कुंटूबासी काही संबंध नाही. वादी व त्यांचे भाऊ केशवराव यांनी प्रतिवादी क्र.४ यांच्याविरुध्द मौजे कात्नेश्वर येथील गट नंबर ४०७ मध्ये ०७ एक्कर १४ गुठठे जमीनीबाबत वाटणीचा मालकी बाबत घोषणीचा व निरंतर मनाई हुकूमासाठी दिवाणी दावा क्रमांक २६/२००४ दाखल केला होता. सदरचा दावा हा दिवाणी

न्यायालया क.स्तर पुर्णा, यांच्या न्यायालयात न्यायनिर्णयीत होवुन मान्य झाला. सदरचा आदेश मा.सर्वेच्च न्यायालय इथपर्यंत कायम आहे. सदरच्या दाव्यातील डिंक्री तामील होण्याकरीता आर.डी.क्र.०३/२००६ ही दिवाणी न्यायालया क.स्तर पुर्णा यांच्याकडे सादर केली ति पुढे तामिलीकरीता जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवण्यात आली. सदरच्या दिवाणी दावा क्रमांक २६/२००४ मधील न्यायनिर्णयमध्ये प्रतिवादी क्र.४ यांना वादमिळकत फेर बदल करण्यापासुन प्रतिबंधीत करण्यात आले होते. तरीही प्रतिवादी क्र.४ यांनी वाद मिळकतीतील ८० आर जमीन प्रतिवादी क्र.५ यांना खरेदी खत क्रमांक १८४०/२०२१ दिनांक ०२/०८/२०२१ रोजी नुसार करून दिली. त्याबाबत वादी यांनी न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान केला म्हणुन दिवाणी किरकोळ अर्ज क्र.११२/२०२१ अवधुत वि. शिवाजी व ज्ञानदेव असा सादर केला होता.

०३. दिवाणी किरकोळ अर्ज क्र.११२/२०२१ मध्ये वादी अवधुत व प्रतिवादी क्र.४ यांच्यात आपसात तडजोड झाली सदर तडजोडी नुसार वाद मिळकत ही तडजोडीने वादी यांना देण्यात आली. दिनांक २४/०२/२०२२ पासुन वादी ने वादमिळकतीचे स्वतंत्र मालक व ताबेदार झाले आहेत. सदर तडजोडीचा दिनांक २४/०२/२०२२ पासुन वादी हे मालकी आधारे ताबा ठेवुन वाद मिळकतीची वहीती करत आहेत. यावर्षी वादी यांनी सदर जमीनीत सोयाबिण पेरलेले आहे. मुळ डिंक्रीतील आदेशानुसार वादीयांच्या हिस्स्याला ९८ आर जमीन येणार होती परंतु तडजोडीमध्ये वादी यांना दोन एक्कर जमीन मिळालेली आहे. सदरची तडजोड ही डिंक्री अंतर्गत आदेशातच आहे.

०४. डिंक्री झाल्यानंतर केशव डावरे यांचा दिनांक २१/०३/२००८ रोजी मृत्यु झाला तसेच त्यांचा मुलगा धनंजय यांचा नोव्हेंबर-२००८ मध्ये मृत्यु झाला. धनंजयच्या मृत्यु नंतर प्रतिवादी क्र.१ हि त्याच्या वारसा पैकी एक वारस आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ हे आपसात संगनमतात असुन वादीच्या विरोधात आहेत ते वादीची मिळकत हडप करण्याच्याा प्रयत्नात आहेत. दिनांक

२४/६/२०२४ रोजी वादी त्यांच्या गडयामार्फत वाद मिळकतीत सोयाबिणची पेरणी करत असतांना आडकाठी निर्माण केली आहे व वादमिळकत कोणालाही फेरबदल करण्याची धमकी दिली. त्यामुळे वादी यांना दिनांक २४/०६/२०२४ रोजी सदरचे प्रतिवादी प्रत सादर करण्याचे कारण घडले. वादीचे प्रति वादप्रत हे प्रथम दर्शनी वादीच्या हक्कात आहे व सुविधेची बाजु देखील वादीच्या हक्कात झुकती आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादीच्या मालकीस इंक्कार केला आहे व बेदखल करण्याची धमकी दिली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना प्रतिबंधीत करणे आवश्यक आहे.

०५. सदर प्रकरणामध्ये प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.१ ते ३ हजर होवुन त्यांनी त्यांचे वादोत्तर नि.क्र.९३ प्रमाणे दाखल केले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, वादी यांनी दिवाणी किरकोळ अर्ज क्र.११२/२०२१ हा दिवाणी दावा क्रमांक २६/२००४ मधील सर्व पक्षकारांना समाविष्ठ न करता केला होता. त्यामुळे सदर अर्जातील तडजोडीला कोणतीही कायदेशिर मान्यता नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, दिवाणी किरकोळ अर्ज ११२/२०२१ मध्ये वादीच्या हक्कामध्ये कोणतीही डीक्री नाही. वादी हे सि.पी.सी.चे कलम ५४ च्या विरोध्दात जाऊन आपल्या मर्जीप्रमाणे वादमिळकतीचा ताबा व मालकी सांगत आहेत. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, दिवाणी दावा २६/२००४ मधील डिक्री प्रमाणे उपअधिकक्षक भूमी अभिलेख यांनी कोर्ट वाटप नकाशा प्रमाणे दिनांक २०/०६/२०२१ व दिनांक ०४/०९/२०२१ रोजी वादी व प्रतिवादी यांना ताबा दिलेला आहे व त्याबाबत पंचनामा व ताबा पावती तयार केली. ताबा पावतीच्या वेळी अवधुत डावरे वादी यांना ९८ आर शेत जमिनीचा ताबा देण्यात आला व हद्दी खुना निश्चीत करुन देण्यात आल्या. दिवाणी दावा क्रमांक २६/२००४ च्या डीक्री प्रमाणे सि.पी.सि.चे कलम ५४ प्रमाणे अमलबजावणी करण्यात आली. दिनांक ०४/०९/२०२४ रोजीच्या अमलबजावणीस कोणत्याही न्यायालयातून स्थगीती नाही त्यामुळे वादीचा दावा चालू शकत नाही. वादी व प्रतिवादी क्र.४ ते ७ हे अपसात संगनमतात आहेत. त्यांच्या डिक्रीच्या अमलबजावणीसाठी आडथळा

आनण्यासाठी वेगवेगळ्या न्यायालयात अनेक प्रकरणे दाखल केली परंतु त्यांना आज पर्यंत यश आले नाही व सदर डिक्री प्रमाणे डिक्रीची अमलबजावणी झाली आहे. त्यामुळे वादी यांना प्रतिवादी क्र.१ ते ३ विरुध्द असा दावा देता येत नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

६. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान वकिलांचे युक्तिवाद ऐकले. वादीने दाखल केलेला अर्ज व दोन्ही पक्षाने दाखल केलेल्या दस्ताऐवजावरुन तसेच युक्तीवादावरुन खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्या अनुषंगाने त्यापुढे कारणासह अभिप्राय नोंदवलेला आहे.

| अ.क्र. | मुद्दे | अभिप्राय |
|---|---|---|
| १. | वादीचा सदरचा अर्ज सकृतदर्शनी आहे का ? | .... होय. |
| २. | अनुकुलतेचा कल वादीच्या बाजुने झुकतो काय ? | .... होय. |
| ३. | वादींचे बाजुने तात्पुरता मनाई हुकुमाचा आदेश पारीत न केल्यास प्रतिवादींपेक्षा वादीचे अपरिमीत नुकसान होईल काय ? | .... होय. |
| ४. | आदेश काय ? | वादीचा अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

७. वादीने त्यांच्या कथनाच्या पुष्ट्यार्थ खालील प्रमाण कागदपत्रे दाखल केली आहेत.

१. दिवाणी किरकोळ अर्ज ११२/२०२१ मधील नि.क्र.०१ वरील दिनांक २४/०२/२०२२ रोजीचे आदेशाची झेरॉक्स प्रत

२. दिवाणी किरकोळ अर्ज ११२/२०२१ मधील नि.क्र.१८ वरील तडजोड पत्राची झेरॉक्स प्रत दिनांक २४/०२/२०२२ रोजीचे आदेश

३. दिवाणी दावा क्रमांक २६/२००४ मधील डिक्रीची झेरॉक्स प्रत

४. मौजे कात्नेश्वर येथील गट क्रमांक ४०७ चा सातबारा उतारा

५. मौजे कात्नेश्वर येथील गट क्रमांक ४०८ चा सातबारा उतारा

६. मौजे कात्नेश्वर येथील गट क्रमांक ४२१ चा सातबारा उतारा

७. मौजे कात्नेश्वर येथील गट क्रमांक ४०७ चा मोजणी नकाशा दिनांक ०२/०६/२०२१

८. दिवाणी दावा क्रमांक २६/२००४ मधील नि.क्र.३४

०९. दिवाणी दावा क्रमांक ३२३/२०२४ मधील नि.क्र.०१ नोटीस सह

१०. प्रतिदावेदार यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे डिक्री अमलबजावणी बाबत घेतलेला आक्षेप दिनांक १४/०१/२०२५

११. नोंदणीकृत दस्त क्रमांक १३१/२०२५ ची सुची क्रमांक २

१२. पिक विमा पावती

१३. तहसिल कोर्ट वाटप संचिका रोजनामा २०२१

१४. प्रतिदावेदार यांनी पोलिस स्टेशन पूर्णा येथे सादर केलेली तक्रार

१५. वादी यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र

१६. प्रतिदावेदार यांनी तहसिलदार पूर्णा यांच्याकडे घेतलेले डिक्री अमलबजावणी बाबतचे आक्षेप

याउलट प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांनी अभिलेखावर खालील कागदपत्रे दाखल केले आहेत.

०१. मोजणीसाठी अर्ज

०२. मोजणीबाबतचा पंचनामा

०३. कोर्ट वाटप तक्ता

मुद्दा क्र.१ ते ३ करीता

८. प्रतिदावेदार यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रतिदावेदार यांच्या वादमिळकतीतील ताब्यामध्ये अडीहरकत करु नये असा मनाई हुकूम मिळणे बाबत दाखल केला आहे. प्रतिदावेदार यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या दिवाणी दावा क्रमांक २६/२००४ मधील हुकूमनाम्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर दाव्यातील वादी व प्रतिवादी हे गट क्रमांक ४०७ क्षेत्रफळ ७ ऐक्कर १४ आर चे मालक व ताबेदार असल्याचे व वादी व प्रतिवादी यांचा सदर वादमिळकतीत प्रत्येकी १/३ हिस्सा असल्याचे त्यात नमुद केले आहे.

प्रतिदावेदार यांनी दाखल केलेला दिवाणी किरकोळ अर्ज ११२/२०२१ मधील नि.क्र.०१ व नि.क्र.१८ वरील तडजोड पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदरचा अर्ज हा प्रतिदावेदार यांनी प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी दिवाणी दावा क्रमांक २६/२००४ मधील न्यायनिर्णयाची बेअदबी केली म्हणून दिलेला होता. सदर अर्जामध्ये नि.क्र.१८ प्रमाणे तडजोड होऊन प्रतिदावेदार यांच्या हक्कात वादमिळकत दिलेली दिसून येते.

९. प्रतिवादी यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या दिनांक ०४/०९/२०२४ रोजीच्या ताबा देण्याबाबतच्या पंचनाम्याचे व ताबा पावतीचे अवलोकन करता त्यानुसार प्रतिदावेदार यांना गट क्रमांक ४०७ मधील ०.९८ आर शेत जमिनीचा ताबा देण्यात आलेला आहे व त्यानुसार मौजे कात्नेश्वर येथील गट क्रमांक ४०७ वरील सातबारा उता-यावरील ०.९८ आर जमिनीवर प्रतिदावेदार अवधुतराव यांचे नाव घेण्यात आलेले आहे. प्रतिदावेदार यांनी दाखल केलेल्या विमा पत्रकाचे अवलोकन करता मौजे कात्नेश्वर येथील गट क्रमांक ४०७ मधील ०.९८ आर जमिनीतील सोयाबीन पिकावर वादी यांनी विमा काढलेला आहे. प्रतिदावेदार यांनी अभिलेखार दाखल केलेल्या मोजणी नकाशाप्रमाणेच प्रतिदाव्यातील चर्तु:सिमा दिसून येतात.

१०. कोर्ट वाटप मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता प्रतिदावेदार यांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीपैकी काही भाग हा सहधारक सुमनबाई अंबादास डावरे यांच्या वहिवाटीत असल्याचा उल्लेख कोर्ट वाटप मोजणी नकाशामध्ये करण्यात आलेला आहे. प्रतिदावेदार यांनी दिवाणी दावा क्रमांक ३२३/२०२४ सुमनबाई विरुध्द महाराष्ट्र शासन या दिवाणी दाव्यातील नि.क्र.०१ ची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे त्यावरुन गट क्रमांक ४०७ मधील सहधारक सुमनबाई यांनी दिवाणी दावा क्रमांक २६/२००४ मधील डिक्री नुसार प्रतिदावेदार यांना देण्यात आलेल्या ०.९८ आर जमिनीबाबत कायम मनाई हुकूमाचा दावा दाखल केलेला आहे. तसेच प्रतिदावेदार अवधुत डावरे यांनी जिल्हाधिकारी

परभणी यांना दिवाणी दावा क्रमांक २६/२००४ मधील डिक्रीची कलम ५४ नुसार अमलबजावणीस आक्षेप दिनांक १४/०१/२०२५ रोजी सादर केलेला आहे. प्रतिदावेदार यांनी दावख केलेल्या खरेदीखत क्रमांक १३१/२०२५ मधील सुचि क्रमांक ०२ चे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी ताबा पावती प्रमाणे यांच्या हिस्सात आलेली गट क्रमांक ४०७ मधील ०.९८ आर शेतजमिन गणेश मुरलीधर चापके यांना विक्री केलेली आहे.

११. मौजे कात्नेश्वर येथील गट क्रमांक ४०७ च्या सातबारा उता-याचे अवलोकन केले असता प्रतिदावेदार यांच्या नावे गट क्रमांक ४०७ मध्ये ०.९८ आर जमिन नोंदणी केलेली दिसुन येते. त्याचप्रमाणे सदर जमिनीपैकी ५० आर जमिनीमध्ये प्रतिदावेदार यांनी गव्हाचे तर ०.४८ जमिनीमध्ये ऊसाचे पिक घेतल्याबाबतची नोद गाव नमुना बारा मध्ये करण्यात आलेली आहे. ७/१२ उतारा व फेरफार या कागदपत्रावरील नोंदी या शासकीय कर्मचा-यांनी त्यांचे पक्षीय कार्य करत असताना घेतलेल्या असतात त्यामुळे भारतीय पुरावा कायदा कलम ३५ नुसार सदर कागदपत्रे हे बरोबर असल्याबाबत गृहित धरता येते. तसेच ७/१२ उतारा किंवा महसुल विभागातील नोंदीला ताब्याबाबत अनुमानित मूल्य असते व जोपर्यत पुराव्याने सदर नोंदीचे खंडन केले जात नाही तोपर्यंत सदर शेतजमिन हि भोगवटदाराच्या ताब्यात आहे असे मानता येईल. त्यामुळे प्रतिदावेदार हे गट क्रमांक ४०७ मधील ०.९८ आर शेतजमिनीच्या ताब्यात असल्याचे दिसुन येते. प्रतिदावेदार यांनी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या विरुध्द पोलिस स्टेशन पूर्णा यांच्याकडे दिलेल्या दिनांक २३/०९/२०२४ रोजी दाखल केलेल्या अर्जावर प्रतिवादी हे प्रतिदावेदार यांच्या वादमिळकतीतील ताब्यात अडीहरकत करीत असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. त्यामूळे सस्कृदर्शणी केस वादीच्या बाजूने आहे. न्यायाचा तराजू देखील वादीच्या बाजूने झुकतो. वादीच्या प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे. या उलट, वादी यांच्या तुलनेत प्रतिवादीचे जास्त नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्यात पुढील आदेश होई पर्यत वादमिळकतीबाबत प्रतिदावेदार यांनी केलेली

तात्पुरत्या मनाई हुकुमाची मागणी मंजुर करणे योग्य होईल. सबब, मी मुदा क्र. १ ते ३ यांचे उत्तर होकारार्थी देते. तसेच मुदा क्र. ४ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रामणे आदेश पारित करत आहे.

| आदेश | |
|---|---|
| १. | वादींचा अर्ज निशाणी क्र. ८० मंजुर करण्यात येतो. |
| २. | प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी अथवा त्यांच्या बाबत इतर कोणीही कायदेशीर प्रक्रिया न अवलंबता वादमिळकतीतील वादी यांच्या ताब्यात प्रस्तुत दाव्यात पुढील आदेश होईपर्यंत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या अडीहरकत करू नये. |
| ३. | अर्जाचा खर्च मुळ दाव्याचे निकालावर. |

MEGHA VENKATRAO POUL

Digitally signed by MEGHA VENKATRAO POUL
Date: 2025.02.28 17:58:47 +0530

दिनांक:- २४.०२.२०२५

(एम.व्ही.पौळ)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
कोर्ट न.०२, पुर्णा.